Volume - 6 (2025)
Special Issue - 1 (March)
RESEARCH HUB
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal
ISSN 2582-9173
Website : www.researchhub.org.in/research-hub !! Email : researchhubjournal@gmail.com

# महिला सक्षमिकरण आणि बौद्धिक संपदा हक्क

**अश्विनी भाउराव चौधरी**
संशोधक विद्यार्थी
Email : chaudharipuja027@gmail.com

**डॉ. राष्ट्रपाल गणवीर**
मार्गदर्शक
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
महिला महाविद्यालय, नंदनवन, नागपूर

---

**प्रस्तावना :**

बौद्धिक संपदा हक्क हा आधुनिक युगातील एक महत्वाचा विषय आहे. हा विषय नवकल्पनाना प्रोत्साहन देतो आणि सर्जनशीलतेचे संरक्षण करतो. महिला सक्षमिकरणामध्ये बौद्धिक संपदा हा हक्क महत्वाची भूमिका बजावते. या हक्काद्वारे महिला या आपल्या कलाकृती, शोध आणि उद्योगासाठी IPR अधिकारांचा वापर करून त्या आर्थिकदृष्ट्या सक्षम बनू शकतात. आणि समाजाच्या प्रगतीमध्ये आपले योगदान देऊ शकतात. २६ एप्रिल या दिवशी जागतिक बौद्धिक संपदा दिवस साजरा केला जातो. आणि या दिवसाचा उद्देश बौद्धिक संपदा अधिकारांबद्दल लोकांमध्ये जागरूकता वाढवणे आणि सर्जनशीलतेला प्रोत्साहन देणे हा या दिवसाचा मुख्य उद्देश आहे.

**बौद्धिक संपदा हक्क म्हणजे काय :**

संशोधन करणारा किंवा निर्माता त्यांच्या बौद्धिक कार्याचे म्हणजेच कला,विज्ञान,साहित्य,अशा अनेक विशिष्ट कालावधीसाठी संरक्षण करण्यासाठी कायद्याने दिलेले कायदेशीर विशेषाधिकार होय. बौद्धिक संपदा एखाद्या व्यक्तीच्या संकल्पनात्मक निर्मिती किंवा रचना निर्मितीच्या मालकीचे संरक्षण करते. हा मालमत्ता कायद्यात वापरला जाणारा शब्द आहे. हे एखाद्या व्यक्तीला त्यांच्या अद्वितीय क्रिएटिव डिझाईनचे अनन्य अधिकार देते. याचा अर्थ असा आहे की, निर्मात्यांच्या परवानगी शिवाय कोणीही त्या सर्जनशील डिझाईनची कॉपी किंवा पूर्णवापर करू शकत नाही. कॉपीराईट, पेटंट, ट्रेडमार्क, औद्योगिक डिझाईन, भौगोलिक संकेत, व्यापार गुपित, डिजिटल मालमत्ता असे सात बौद्धिक संपदेचे प्रकार आहेत.

**किवर्ड :** पेटंट, तंत्रज्ञान, उद्योग रचना.

**उद्देश :**

1. महिलांना आर्थिक प्रकारची मदत मिळवून देण्यासाठी स्त्रोत ओळखणे आणि तरुण मुलींमध्ये उद्योजकीय वृत्ती निर्माण करणे आणि स्वतच्या बळावर काहीतरी करणे, म्हणजेच नोकरदार बणण्याऐवजी मालक बनून राहण्याची हिम्मत ठेवेल.
2. संपूर्ण महिला समाजाला चांगल्या आरोग्याचे आणि पोषक घटकांचे महत्व पटवून देणे.
3. महिला आणि मुलींना स्वसंरक्षणासाठी प्रेरित करून त्यांच्या सोबत ज्या प्रकारे विविध्य प्रकारचा भेदभाव

होतो. यांच्या विरुद्ध आवाज उठविणे.

4. सेवा, ज्ञान तसेच रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या बाबतीत स्त्री-पुरुषांना समान संधी उपलब्ध करून देणे.
5. बौद्धिक संपदा हक्क गंभीर परिस्थिति हाताळण्यासाठी महिलांची शारीरिक आणि मानसिक वृत्ती मजबूत करते.
6. महिलांना त्यांच्या व्यक्तीगत आणि सामाजिक जबाबदारीची जबाबदारी घेण्यास सक्षम बनविणे. तसेच महिलांना निर्णय प्रक्रियेत योग्यरित्या सहभागी करून घेणे.

**बौद्धिक संपदा आणि महिला सक्षमिकरण :**

जगातील अनेक भागात कायद्यानुसार महिलांना पुरुषासारखी वागणूक दिली जात नाही. तसेच पुरुषांना जसे स्वातंत्र्य आहे तसे महिलांना नाही. स्त्री आणि पुरुषांमध्ये भेदभाव केला जातो. तसेच जमीन घेण्यापासून ते महिलांना वारसा मिळवण्यापर्यंत, महिलांचे नुकसान केले जाते. म्हणूनच हा हक्क महिलांना संरक्षण देऊन त्यांची विसंगती दूर करण्यास मदत करते. आणि जेव्हा बौद्धिक संपदा अधिकारांचे संरक्षण हे मजबूत असते, तेव्हा महिलांचे हक्क देखील सुरक्षित असते. बौद्धिक संपदा प्रणालीमध्ये महिलांच्या सहभागाला प्रोत्साहन दिले जाते. या हक्कात लिंग भेद केला जात नाही. समान हक्क दिले जाते. WIPO द्वारे महिलाना आणि मुलींना बौद्धिक संपदा हक्क क्षेत्रात एक वर्षाचे प्रशिक्षण दिले जाते. तसेच ही संस्था महिलांना त्यांच्या कामाचे संरक्षण करण्यासाठी आणि त्यांचे मूल्य वाढवण्यासाठी आवश्यक असलेले समर्थन आणि संसाधने प्रदान करण्यासाठी समर्पित आहे. ही संस्था महिलांचा फायदाच करत नाहीतर ते त्यांच्या समुदयामध्ये परिवर्तन घडवून आणतात. आणि या मुळेच महिलांच्या नेतृत्वाखालील अधिक व्यवसायांना भरभराठीसाठी संधी निर्माण करतात. आणि महिलांमध्ये परीक्षेच्या काळात आर्थिक लवचिकता वाढवते. महिला या कौटुंबिक जबाबदाऱ्या किंवा करिअर ब्रेकची पर्वा न करता विज्ञान, तंत्रज्ञान आणि कलाबद्दलची तिची आवड जोपासण्याची संधी प्रत्येक महिलेला मिळावी आणि त्याची संधी सर्वांनी घ्यावी. असे या संस्थेचे उद्दिष्ट आहे. तसेच हा हक्क महिलांना सक्षम करण्यासाठी आणि त्यांना जागृत करण्यासाठी आहे. तसेच WIPO ही संस्था विविध देशामध्ये विविध प्रकारचे आयपी मार्गदर्शन कार्यक्रम सुरू करत आहे. आणि हे कार्यक्रम महिलांच्या नेतृत्वाखालील व्यवसायांना व्यवसाय वाढीसाठी त्यांच्या आयपी मालमत्तेचे संरक्षण आणि वापर करण्यात आणि यशस्वी होण्यास मदत करण्यासाठी मार्गदर्शन, ज्ञान आणि संसाधने प्रदान करतात. उदा. आफ्रिकेसारख्या देशामध्ये सुद्धा WIPO च्या महिला उदयोजकांसाठीच्या आयपी प्रकल्पाद्वारे, युगांडातील ७० महिला उद्योजकांनी त्यांचे ट्रेडमार्क नोंदणीकृत केलेले आहेत, जे त्यांना त्यांच्या व्यवसायाचे अधिक प्रभावीपणे ब्रँडीग आणि प्रचार करण्यास आणि बाजारात स्पर्धा करण्यास सक्षम करण्यासाठी महत्वाचे पहिले पाऊल उचलले. आणि त्या महिलांनी आपला स्वत:चा एक ब्रँड तयार केला. तसेच हा प्रकल्प मुरिबू लिलियन नॉन्टूमे यासारखे मार्गदर्शक असल्यामुळे हा प्रकल्प यशस्वी आहे. मुरिबू लिलियन नॉन्टूमे यांनी महिलांना त्यांच्या पूर्ण क्षमतेचा उलगडा करण्यासाठी सक्षम करणारे नेटवर्क आणि संसाधने प्रदान करतात त्यांनी आयपी चा वापर करून समुदाय पातळीवर महिलांना पाठिंबा देऊन महिलांना सक्षम बनवण्याचा प्रयत्न करत आहे. आणि त्याबरोबरच त्यांचे व्यावसायिक उद्दिष्टे पुढे नेण्यास आणि त्यांची क्षमता साकार करण्यास मदत करत आहे. अशा प्रकारे बौद्धिक संपदेचा हक्क वापरुन महिलांना योग्य तो न्याय मिळत

आहे.

महिलांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि भविष्यात संशोधकासाठी एक आदर्श निर्माण करण्यात बौद्धिक संपदा हक्काची भूमिका दर्शविते. उदा. समावेशकतेला प्रोत्साहन देण्यासाठी बौद्धिक संपदेचा वापर कसा करता येतो याचे आणखी एक उदाहरण अरुणाचलम मुरूगनंतम यांच्या बाबतीत दिसून येते, ज्यांना पॅडमॅन म्हणून ओळखले जाते. त्यांनी कमीतकमी किमतीत सॅनिटरी पॅड तयार करण्याचा निर्णय घेतला आणि नंतर त्यासाठी प्रयत्न केले. आणि मुरूगनंतम यांनी अशी मशीन तयार केली जी वापरकर्त्याला अगदी सोप्या पद्धतीने वापरता येईल, ही मशीन अशिक्षित व्यक्ति देखील चालवू शकते. आणि त्यांच्या शोधामुळे मासिक पाळीच्या स्वच्छता उद्योगात आणि भारतात क्रांती घडवून आणली आहे. आणि महिलांसाठी सामाजिक बदल घडवून, तसेच महिलांचे आर्थिक सक्षमिकरण केलेले आहे. याबरोबरच महिलांसाठी सॅनिटरी उत्पादनाची उपलब्धता वाढली आहे. अशा प्रकारे मुरूगनंतम यांनी पर्यावरणपुरक तंत्रज्ञानाचे संरक्षण करून, संशोधन करणारा आणि त्याचबरोबर व्यवसाय करणारा त्यांच्या प्रयत्नामधून त्यांनी केलेली गुंतवणूक आणि नफा सुद्धा परत मिळवू शकते. अशा प्रकारे बौद्धिक संपदा हक्क महिलांना आर्थिकदुष्टया सक्षम करते. तसेच हा हक्क महिलांना नवीन व्यवसाय आणि उत्पादने विकसित करण्यासाठी प्रोत्साहन देतो,तसेच बौद्धिक संपदेच्या माध्यमातून नवीन नोकऱ्या मिळतात आणि त्या आपल्या कौशल्यावर आधारित काम करू शकतात. आणि महिलांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यास मदत करते आणि त्यांना समान संधी मिळवून देते. जागतिक स्तरावर पाहिले तर जागतिक बौद्धिक संपदा संघटना (WIPO) महिला सक्षमिकरण आणि बौद्धिक संपदेच्या माध्यमातून लैंगिक समानता आणि सामाजिक, तसेच आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी काम करत असते.

**निष्कर्ष :**

बौद्धिक संपदेच्या माध्यमातून महिलांना सक्षम करून, आपण लैंगिक समानता आणि सामाजिक प्रगती साधण्याचा प्रयत्न करू शकतो. विविध क्षेत्रामध्ये समावेशकता सक्षमिकरण आणि विकासाला चालना देण्यासाठी बौद्धिक संपदा हक्क महत्वाचा आहे. बौद्धिक संपदा हक्क कायदा आणि सार्वजनिक हित यांच्यात समतोल साधण्यात आणि आकार देण्यात भारतीय न्यायव्यवस्थेने महत्वाची भूमिका बजावली आहे असे दिसून येते. बौद्धिक संपदा हक्क एक विशेषाधिकार प्राप्त वर्गापूर्तेच मर्यादित नसावेत तर ते सामाजिक, आर्थिक स्थिति किंवा भौगोलिक कोणतेही स्थान असो, सर्वांनाच उपलब्ध असलेच पाहिजे. बौद्धिक संपदेमुळे महिलांना न्याय मिळत आहे महिलांसाठी हा हक्क त्यांना योग्य दिशेने घेऊन जाईल आणि या हक्कामुळे महिलांना समाजात आदर मिळेल. त्याबरोबरच महिलांना स्वत:च्या निर्मितीचा फायदा घेता आला पाहिजे. त्यावर त्यांना मालकी हक्क स्थापन करता आला पाहिजे. अशा कितीतरी महिला असतील ज्यांना त्यांच्या निर्मितीच्या पेटंटची माहिती त्यांच्या घरातून मिळेल ? अनेक महिलांना व्यवसाय सुरू केल्यानंतरही महिला या बौद्धिक संपदा अधिकारपासून अज्ञान आहेत. समान संधीसोबतच, महिलांना याबद्दल जागरूक करणे देखील महत्वाचे आहे. एक महिला म्हणून तसेच एक उद्योजक म्हणून आपल्याला बौद्धिक संपदा अधिकाराची माहिती असणे आवश्यक आहे.

**समारोप :**

बौद्धिक संपदा हक्काची नोंदणी करून आपल्या कल्पनाचे संरक्षण करणे आजच्या आधुनिक काळात अत्यंत आवश्यक आहे. आणि ही काळाची गरज आहे. पेटंट, ट्रेडमार्क, कॉपीराईट आणि डिझाईन हक्क यासारख्या अनेक उपायाद्वारे आपली सर्जनशीलता आणि संशोधनाचे कायदेशीर रक्षण करता येते. तसेच आपल्या इच्छेविरुद्ध आपली सर्जनशीलता कोणीही वापरू शकत नाही. आणि बौद्धिक संपदा आपल्या सर्जनशीलतेच संरक्षण करते. डिजिटल युगात माहितीच्या चोरीचा धोका वाढल्याने ऑनलाइन सुरक्षा आणि कायदेशीर संरक्षण महत्वाचे ठरत आहे. या ऑनलाइन युगात आपल्या माहितीचा कोणीही वापर करू शकतो यासाठी बौद्धिक संपदा हक्क उपयोगी पडते. तसेच यात फक्त नोंदणी करून थांबणे पुरेसे होत नाहीतर, भविष्यात होणाऱ्या जोखमी टाळण्यासाठी योग्य त्या कायदेशीर बाबी आखणे अत्यंत महत्वाचे आहे.

**संदर्भसुची** :


- "workshop" on महिला सबलिकरण व सक्षमिकरण आणि बौद्धिक संपदा.. https//www. sscmotala.ac.In
- बारड प्रा. डॉ. प्रदीप हिम्मतराव :- बौद्धिक संपदा अधिकार : जाणीव-जागृती, अथर्व पब्लिकेशन्स.
- https://www.herzindagi.Com
- lifeandlaw.in/indexphp
- wipo.int/web/wipo-magazine
- https://bbditm.ac.in/ip-cell
- https://www.theippress.Com
- https://aucbm.In.womens
- https://www.Pvkkit.ac.In
- https://www.thehindu.com
- गोविलकर. वी. म. बौद्धिक संपदा अधिकार, (२०११) पुणे डायमंड पब्लिकेशन्स.